पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- ०६/०८/२०२०

# शासकीय रकमेचा अपहार करणारे रॅकेट गजाआड

- **मा. पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई**

जिल्हा परिषद गडचिरोली अंतर्गत जलसंधारण विभागाचे युनीअन बॅंक शाखा, गडचिरोली येथील बचत खाते 592802010011800 क्रमांकावरील दिनांक 03.06.2019 रोजी आरोपीतांनी जलसंधारण अधिकारी तसेच मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांच्या बनावट स्वाक्ष-या व कार्यालयीन शिक्के मारुन आर.टि.जी.एस. ( R.T.G.S.) संबधात पत्र तसेच बनावट धनादेश क्रमांक 12025801 प्रमाणे तयार करुन नमुद क्रमांकाचे बॅक खात्यामध्ये शिल्लक असलेल्या एकुण 6,22,59,351/- रुपये रकमेपैकी एकुण 2,86,13,851/- रुपये विड्राल करुन आर.टि.जी.एस.(R.T.G.S.) चे माध्यमाने 1. रामदुत कन्स्ट्रक्शन कंपनी खाते क्र.60325616275(2) निर्वाना बिल्डर्स खाते क्र. 22411110003022(3) चिरंजीवी ट्रेडलींक खाते क्र.50487333227(4) उत्कर्ष निर्माण कंपनी खाते क्र000101780002215(5) पवनसुत कन्स्ट्रक्शन कंपनी खाते क्र 60330938089 इत्यादी बॅक खात्यांमध्ये वळती करुन दिनांक 03.06.2019 ते दिनांक 12.06.2019 दरम्यानचे कालावधीत वरील प्रमाणे नमुद शासकिय रकमेचा अपहार केला असल्याबाबत लक्षात आल्याने त्याबाबत लेखी फिर्याद वरुन दिनांक 19.09.2019 रोजी पोलीस स्टेशन गडचिरोली येथे भादंवि कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाची व्यापकता व गांभीर्य लक्षात घेता मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचे आदेशान्वये सदर गुन्हयाचा पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा,पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली यांचेकडे वर्ग करण्यात आला होता.

गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने पोलीस अधिक्षक श्री शैलेश बलकवडे यांच्या नेतृत्वात श्री डॉ मोहीतकुमार गर्ग अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) यांनी स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली येथील अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेवुन गुन्हयाचे तपासा संदर्भात मार्गदर्शन केले त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेतील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांनी अत्यंत संयमाने तपासाचे नियोजन करुन अत्यंत चिकाटीने तपास करुन अपहारीत घटनेच्या संबधाने संबधीत विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा करुन तपासाचे दृष्टीने आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेतली. सर्व बाबींची माहीती संकलीत झाल्यानंतर मा पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे मार्गदर्शनात गुन्हयातील आरोपीतांच्या अटक प्रक्रियेसंबधाने ६ वेगवेगळे स्वतंत्र पोलीस पथक तयार करण्यात आले. मा.अपर पोलीस अधिक्षक प्रशासन यांनी सर्व तपास पथकांचा पाठपुरावा करुन त्यांचे निर्देशा प्रमाणे मध्यप्रदेश राज्यातील रेडडी जि. शिवनी तसेच भंडारा, नागपुर येथे

एकाच वेळी छापे टाकुन गुन्हयातील मुख्य आरोपीसह इतर 5 सहकारी आरोपीतांना वेगवेगळया ठिकाणावरुन ताब्यात घेण्यात आले. एकमेकांसमोर येताच आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली.

सदर गुन्हयात स्नेहदिप श्रीराम सोनी वय 47 वर्षे रा. नंदनवन केडीके कॉलेज नागपुर 2) किशोरीलाल हिरालाल डहरवाल वय 51 वर्षे,रा. रेड्डी ता. कुरई जि. शिवनी (म.प्र.) 3) सुदीप श्रीराम सोनी वय 51 वर्षे रा.नाईक रोड, महाल नागपुर, 4) अमित मनोहर अग्नीहोत्री वय 35 वर्षे, रा. धनगवळी नगर हुडकेश्वर नागपुर 5) अतुल देवीदास डुकरे वय 42 वर्षे, रा.प्लाट क्रमांक 66 आशिर्वाद नगर नागपुर 6) विनोद मंगलसिंग प्रधान, वय 47 वर्षे रा. करडी ता. मोहाडी जि.भंडारा यांना दिनांक 05.08.2020 रोजी ताब्यात घेवुन मा.न्यायालयात हजर करण्यात आले असता, संबधीत मा.न्यायालयाने गुन्हयाची व्यापकता व गांभीर्य लक्षात घेवुन आरोपीतांचा 10 दिवसांचा पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे. सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान गुन्हयाचे घटनाक्रमादरम्यान सक्रिय असलेल्या व आरोपीतांना वेळोवेळी माहिती पुरविणा-या इतर आरोपीतांचे नावे निष्पन्न होण्याची दाट शक्यता आहे.

सदरची कारवाई श्री शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक, श्री मोहीतकुमार गर्ग अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) गडचिरोली यांचे नेतृत्त्वात गुन्हयाचे तपासी अधिकारी तथा पोलीस निरीक्षक उल्हास पी. भुसारी, सहा.पोलीस निरीक्षक विक्रांत सगणे, पोलीस उप निरीक्षक भागवत कदम, महिला पोलीस उप निरीक्षक पुनम जगताप, तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील कर्मचारी यांनी केलेली असुन पोलीस निरीक्षक बाळासाहेब भरणे, पोलीस निरीक्षक विपीन शेवाळे, सहायक पोलीस निरीक्षक चेतनसिंग चव्हाण पोउपनि स्वप्नील गोपाले, यांचे आरोपी अटक करण्यात विशेष सहकार्य लाभले.

अपर पोलीस अधीक्षक श्री. मोहीत कुमार गर्ग सा़ो., स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी पोनि उल्हास भुसारी यांनी व त्यांच्या संपुर्ण टिमने गुन्हा दाखल झाल्यापासुन तो उघडकीस आणण्याकरीता घेतलेली मेहनत, तांत्रीक पुरावा जमा करण्यासाठी केलेले प्रयत्न यांना यश येवुन आज गडचिरोली पोलीस दलाने आरोपी गजाआड करण्यात यश प्राप्त केले असल्याचे सांगुन मा. पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे सा़ो. यांनी संपुर्ण तपास पथकाचे कौतुक व अभिनंदन करत संपुर्ण तपास पथकास २५ हजार रुपयाचे पारीतोषिक जाहीर केले आहे.

